# दिव्य वार्ता

दशहरा की हार्दिक शुभकामनाएं

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.१ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३


# बप्पा..बप्पा... कपडे खराब होतेत ना...

## पूरग्रस्त पोरं पाण्यात अन् खासदार सोनवणे होडीवर

## कपडे खराब होऊ नये म्हणून शाही दौरा?





बीड , (दिव्य न्युज):- परतीच्या पावसाने महाराष्ट्रात हाहाकार उडवला. मराठवाड्यात पावसामुळे शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. हातातोंडाशी आलेलं पिक पाण्यात गेलं आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला महाराष्ट्र धावून आला आहे. नेते, मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन विचारपूस करत आहे. अशातच बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनीही पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली. पण, कपडे खराब होऊ नये म्हणून खासदार सोनवणे एका होडीवर बसले होते. गावातील तरुण हे पाण्यातून चालत होडी ओढत होते. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी बीडमधील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. पण त्यांचा हा दौरा वादात अडकला आहे. कपडे खराब होतील म्हणून पूरग्रस्त भागातील ग्रामस्थांनाच खासदार सोनवणे बसलेली होडी ओढावी लागली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मोहन जगताप यांचाही दौऱ्यामध्ये सहभाग आहे.७५ वर्षांच्या आजोबांनी ३५ वर्षीय महिलेशी केलं लग्न, सुहागरात ठरली शेवटची रात्र, सकाळी मृत्यू

बीडच्या माजलगाव मधील गोदावरी नदी काठच्या पूर्वग्रस्त भागात आज बजरंग सोनवणे यांनी दौरा केला. गावात शिरलेले पाणी पाहण्यासाठी सोनवणे गेले होते. पण पाणी जास्त असल्यामुळे खासदार सोनवणे काही पाण्यात उतरले नाही. एका थर्माकॉलच्या होडीवर खासदार सोनवणे बसले, त्यांच्यामागे मोहन जगताप आणि आणखी एक कार्यकर्ता होता. तर चार तरुण हे मानेपर्यंत असलेल्या पाण्यात उतरलेले होते. हे तरुण खासदारसाहेबांची होडी ओढत होते.

## नारायणड संस्थान येथे दसरा मेळाव्यासाठी येणाऱ्या भाविक आणि नागरिकांसाठी उपाय योजना करा - आ.संदीप क्षीरसागर

### मनोज जरांगे यांची उपस्थितीत दसरा मेळावा



बीड,(दिव्य न्युज):- नारायणगड (धाकटी पंढरी) येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी येणाऱ्या भाविक आणि नागरिकांसाठी उपाय योजना करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.भ.प.श्री.शिवाजी महाराज आणि संघर्षयोद्धा मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत नारायणगड (धाकटी पंढरी) येथे दसरा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याठिकाणी मोठ्या संख्येने भाविक आणि नागरिक येणार आहेत. त्यामुळे पोलिस विभागाकडून वाहतूक व्यवस्था, गर्दी नियंत्रण, सुरक्षेची काटेकोर व्यवस्था, आरोग्य विभागाकडून प्राथमिक उपचार केंद्र, रुग्णवाहिका तसेच वैद्यकीय पथकांची उपलब्धता करून द्यावी, एस.टी.महामंडळाकडून अतिरिक्त बस गाड्यांची सोय व वाहतुकीची व्यवस्था करावी, तहसील कार्यालय व महसूल विभागाकडून आवश्यक शासकीय देखरेख, समन्वय, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावरून ▶▶ पान २ वर

## इंदूरच्या कापड बाजारातून मुस्लिमांना का बाहेर काढलं जातं




इंदूर,(दिव्य न्युज):- मध्यप्रदेशची आर्थिक राजधानी असलेल्या इंदूरमधील कापड बाजारात मुस्लीम सेल्समन आणि व्यापाऱ्यांना काम करण्यास मनाई करण्यात आली आहे.हा काही प्रशासकीय निर्णय किंवा आदेश नाही. तर इंदूर-४ या विधानसभा मतदारसंघातील भाजपाच्या आमदार मालिनी गौड यांचा मुलगा एकलव्य सिंह गौड यांनी काढलेला 'आदेश' आहे.या प्रकरणाबाबत बीबीसीनं एकलव्य गौड यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी बोलण्यास नकार दिला.शीतलामाता कापड मार्केटचे अध्यक्ष हेमा पंजवानी यांनी सांगितलं की २५ ऑगस्टला बंद खोलीत झालेल्या एका बैठकीत एकलव्य सिंह गौड यांनी व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली होती.

या बैठकीत शीतलामाता कापड बाजारातील व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींसाठी हा आदेश जारी केला.यानंतर एकलव्य सिंह गौड यांनी स्थानिक प्रसारमाध्यमांसमोर अनेकदा वक्तव्यं दिलं की, माझ्याकडे अनेकदा लव ▶▶ पान २ वर

### चांदणी चौक, जुना पुल ते राजुरीवेस पर्यंत रस्त्यावर पडले खड्डे

## आठ दिवसात बुजवा नसता खड्ड्यात बसून आंदोलनाचा हाजी महेबूब खान यांचा इशारा




बीड , (दिव्य न्युज):- मागील आठ दिवसापासून बीड शहरात जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. तसेच पेठ बीड भागातील मोहंमदिया कॉलनी, मोमीनपुरा, दिलावर नगर, अख्तर नगर या परिसरात चिखलच चिखल झाला असून येणाऱ्या आठ दिवसात चांदणी चौक, जुना पुल ते राजुरीवेस पर्यंतचे सर्व खड्डे नगर पालिका प्रशासनाने तात्काळ ▶▶ पान २ वर

## सारथी वसतिगृहे योजना प्रभावीपणे राबवा-डॉ.मेटे



बीड,(दिव्य न्युज):- मराठा, कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक वसतिगृह सुरू करण्यात यावे अशी मागणी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मराठा, कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक वसतिगृह सुरू करण्याच्या प्रस्तावाला गती मिळालेली नाही. पुणे जिल्हा वगळता इतर कोणत्याही जिल्ह्यात खासगी संस्थांमार्फत ही वसतिगृहे सुरू होऊ शकली नाहीत. खासगी संस्थांनी स्वारस्य न दाखवल्यामुळे ही योजना रखडली आहे.या ▶▶ पान २ वर









## भ्रष्टाचाराची पोलखोल करणाऱ्या पत्रकाराचा संशयास्पद शेवट

### 'तो' व्हिडिओ ठरला मृत्यूचं कारण?



देहरादून,(वृत्तसेवा):- मागील १० दिवसांपासून बेपत्ता असलेल्या पत्रकाराचा मृतदेह सापडला आहे. राजीव प्रताप सिंह असं मृत पत्रकाराचं नाव आहे. स्वतंत्र पत्रकारिता करणाऱ्या राजीव प्रताप सिंह यांच्या मृत्यूबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी राजीव प्रताप ▶▶ पान २ वर

## बीडच्या कंकालेश्वर मंदिरासह औंधचे संग्रहालय राज्याचा अमूल्य सांस्कृतिक ठेवा



मुंबई,(दिव्य न्युज):- बीड येथील कंकालेश्वर मंदिर व सातारा जिल्ह्यातील औंध येथील संग्रहालय हे महाराष्ट्राचा सांस्कृतिक व ऐतिहासिक अमूल्य ठेवा आहे. या वारशाचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी असून, ते करताना कामे दर्जेदार ▶▶ पान २ वर

## जवळा येथे बैलगाडी विहिरीत पडून बैल दगावला



दिंदुड,(दिव्य न्युज):- धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील शेतात ओढ्याच्या साईडने बैलगाडी घेऊन निघालेल्या गड्यासह बैलगाडी जुन्या विहिरीत पडली. मात्र या अपघातात एक बैल व गडी सुरक्षित असून एक बैल दगावल्याची घटना काल (दि ०१ आक्टोंबर) बुधवारी दुपारी ▶▶ पान २ वर

## 'रोडकरी' नितीन गडकरींना इम्तियाज जलील यांचे आव्हान



औरंगाबाद, (दिव्य न्युज):- देशात दळणवळणासाठी रस्ते आणि उड्डाणपुलांचे प्रचंड मोठे जाळे निर्माण केल्यामुळे 'रोडकरी' या नावाने ओळखले जाणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सध्या सामाजिक आणि राजकीय लोकांच्याही निशाण्यावर आहेत. इथेनॉल प्लांट आणि त्यातून ▶▶ पान २ वर


## अनिल देशमुखांवरील हल्ला खोटा होता?



नागपूर ,(दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. माजी गृहमंत्री - पळश्र ऊशीहर्ीज्ञह यांच्यावर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी झालेल्या कथित हल्ल्याप्रकरणी आता मोठी माहिती समोर येत आहे. नागूपर ग्रामीण पोलीस ▶▶ पान २ वर

# दसरा, गांधी जयंती आणि बीड जिल्ह्याची सद्यस्थिती : संघर्ष, परंपरा आणि आशेचा दीप

बीड जिल्हा सध्या अतिवृष्टीच्या छायेत आहे . गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या , नाले तुडुंब भरून वाहत आहेत ; अनेक शेतं पाण्याखाली गेली आहेत ; घरं, रस्ते, शिवार यांत पाणी साचले आहे . शेतकरी हवालदिल झाले आहे . पिके पाण्याखाली गेल्याने आर्थिक नुकसान झाले आहे . पावसाच्या धारा कितीही जोरात कोसळल्या तरी मनातील आशेचा दिवा विझू देऊ नका . आजही गावोगावी पाणी साचले आहे , गावांचा संपर्क तुटलेला आहे , रस्ते बंद झाले आहेत . प्रशासन , पोलीस दल , महसूल विभाग सतत कार्यरत आहे . ग्रामपंचायत अधिकारी , सहाय्यक कृषी अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्यासह अधिकारी वर्ग मदतीसाठी दिवस-रात्र धावपळ करत आहे . मदतीसाठी नियंत्रण कक्ष सतत सुरू आहे .



दसरा किंवा विजयादशमी हा हिंदू संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे . प्राचीन काळापासून हा सण चांगल्याचा वाईटावर विजय दर्शवतो . रामायणानुसार प्रभू श्रीरामांनी याच दिवशी रावणाचा वध करून सीतेची सुटका केली आणि अयोध्येला परतताना हा दिवस विजयाचा उत्सव म्हणून साजरा करण्यात आला . महाभारतातील पांडवांनी अज्ञातवास संपल्यानंतर आपल्या शस्त्रांची पूजा करून पुन्हा युद्धात विजय मिळवण्यासाठी हा दिवस निवडला होता . त्यामुळे दसऱ्याला विजयादशमी असे नाव पडले . दसरा म्हणजे वाईट प्रवृत्तींचा पराभव आणि नवी सुरुवात करण्याचा दिवस . या दिवशी लोक रावण दहन करतात, सोन्याची पाने देवांना अर्पण करतात आणि एकमेकांना देतात, जे समृद्धी आणि ऐक्याचे प्रतीक आहे . रावण फुंकला की वाईट जळून खाक झाले, आता अंतःकरणातील भीती, राग, लोभ यांना ही जाळून टाका .

२ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधींचा जन्मदिन आहे . राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे मोहनदास करमचंद गांधी हे सत्य, अहिंसा आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण होते . त्यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात . गांधीजींनी दिलेली शिकवण – सत्य : जीवनात सत्याला सर्वोच्च स्थान द्या, अहिंसा : हिंसेऐवजी शांततेने संघर्ष करा, स्वावलंबन : खादी, स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग निवडा, सहिष्णुता : सर्व धर्म, जात, समाज यांना समानतेने पाहा . आजच्या परिस्थितीत गांधीजींच्या शिकवणीचा खरा अर्थ आपल्याला जाणवतो . पूरस्थितीत एकमेकांना सहकार्य करणे, खोट्या अफवांवर विश्वास न ठेवणे, संयम राखणे हेच त्यांचे तत्त्वज्ञान होते . तुम्ही जगात पाहू इच्छिता तो बदल स्वतः घडवा ! हा गांधीजींचा मंत्र आज अधिक महत्त्वाचा ठरतो .बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अवस्था गंभीर आहे . घरात पाणी , शेतात पाणी , जनावरांसाठी चाराचा प्रश्न , अन्नधान्याची टंचाई – अशा वेदनादायक परिस्थितीतही बीडकर खंबीरपणे उभे आहेत . तहसीलदार शेळके यांनी भावनिक आवाहन केले : तरुण मित्रांनी पुढे यावे ; आपले हात मदतीसाठी पुढे करावेत . वृद्ध, निराधार, आजारी नागरिक यांना आधी मदत करावी . कोणत्याही परिस्थितीत जीवित हानी होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यावी . आपण सर्व खंबीर आहात ; आपल्यातले बळ मला माहीत आहे . या संकटावर आपण एकत्रितपणे मात करू . प्रशासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे . मदतीसाठी व संपर्कासाठी आपण नेहमी तयार आहोत . कधीही संपर्क साधा .दसरा फक्त रावण दहन करण्याचा सण नाही , तर मनातील निराशा , भीती आणि अशक्तपणा जाळून टाकण्याचा दिवस आहे . आज या संकटाच्या काळात आपण एकत्र येऊन गावोगावी एकतेची मशाल पेटवूया . उद्याची पहाट सोनेरी आहे, आजचे ढग काळे आहेत तरी आशेचा किरण उगवेलच . गावात स्वच्छतेचे काम सुरू करावे, शेतातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने करून द्यावेत, पूर ओसरल्यानंतर पिण्याचे पाणी उकळून वापरावे, मुला-मुलींना सुरक्षित ठिकाणी ठेवावे, प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.गांधीजींनी दिलेला स्वावलंबनाचा मंत्र आजही तितकाच उपयुक्त आहे . गावोगावी लोकांनी एकत्र येऊन परस्पर साहाय्य करावे , पूरग्रस्तांना अन्नधान्य , कपडे , औषधे यांची मदत द्यावी . सत्याग्रह हा केवळ संघर्ष नाही , तो स्वच्छ समाजासाठीची शपथ आहे .पावसाचा जोर ओसरलाच पाहिजे, पण आपल्या मनातील जिद्द वाढली पाहिजे . दसऱ्याचा रावण जळतोच , पण मनातील भीती, नैराश्य आणि वेदना देखील जळल्या पाहिजेत . गांधीजींच्या मार्गावर चालून आपण पुन्हा एक नवा दिवस घडवूया . सोनेरी भवितव्याची पहाट आपल्यासाठी उगवेल – या विश्वासानेच दसरा आणि गांधी जयंती साजरी करूया . या दसऱ्याला खरेदी कमी करा पण आशेचा दिवा जास्त लावा . गांधी जयंतीच्या दिवशी स्वतःशी वचन द्या – मी माझ्या गावासाठी, माझ्या लोकांसाठी, माझ्या जिल्ह्यासाठी सदैव तयार राहीन !

दिव्य वार्ता विशेष

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार , बीड



# सरळ स्वभावी मित्र...काझी मकदुम

काझी मखदुम, आमचे सरळ स्वभावी मैत्, बीडमध्ये मी १९९० च्या सुमारास पाटोदा सोडून आलो, त्यानंतर पत्रकारामध्ये वावरताना यांची आणि माझी मैत्री झाली. त्या काळात मुंबईच्या उर्दू दैनिकासाठी बीडमधून पात्रकारीता करणारा हा उत्साही मित्र. पुढे १९९४ मध्ये मी संकेत सुरू केले आणि पहिले कार्यालय बशीरगंज मध्ये होते, हा परिसर तसा मुस्लिम बहुल. इथे आमची मैत्री घट्ट झाली. पत्रकारिता करायची म्हणजे लोकांना भेटायचे, गप्पा मारायच्या, बातम्या मिळवायच्या, आणि लिहायच्या, हे करताना आपोआपच समव्यवसाई मित्र वाढतात. मी दैनिक सुरू करण्या आगोदरच जवळ जवळ २० वर्षे पत्रकारिता (पाटोद्यातून १९९० पर्यंत) करत असल्याने लोकसंपर्क हा माझा स्वभाव होताच. त्या मुळे तो संकेतचाही स्वभाव झाला आणि बशीरगंजमध्ये कार्यालय असल्यामुळे संकेतला इतरा प्रमाणेच अनेक बीड शहरातील मुस्लिम मित्रही मिळाले, त्यासाठी काझी मखदूम आणि सी आर पटेल यांची मैत्री कामी आली. अनेक मुस्लिम धुरिन त्यांच्यामुळे संकेत कार्यालयात येऊन गेले. बशीरगंजच्या कार्यालयात एका वेळी १०-१० पत्रकार बसत आणि गप्पाचा अड्डा रंगत असे. पत्रकारांचे अनुभव, माहिती आणि समोरच्या आशियानाचा चहा रंगत अनायचा. त्याच्या आठवणी आजही अनेक पत्रकार काढतात. कार्यालयाच्या जवळ हाकेच्या अंतरावर नगरपालिका, जिल्हा परिषद,ि ऑफिस, सरकारी दवाखाना व इतर





साथ मिळाली. आणि काझीने तामिर नावाचे प्रथम उर्दू आणि काही काळानंतर मराठी दैनिक सुरू केले. काझी म्हणजे कोणतेही काम जिव ओतून करणारा कंडाळू पत्रकार. त्याला दैनिकासाठी मुशिर, मिम नाग सारखे सिद्धहस्त उर्दू पत्रकार, लेखक मिळाले, काझी तर हार्डवर्कर होताच. रात्री २-२ वाजेपर्यंत बिस्कीट, पाववडे खाऊन सर्वजण काम करत असत. त्यामुळे त्यांच्या दैनिकाने उर्दू क्षेत्रात नावही चांगले कमावले. पण दैनिकाने नाव, प्रतिमा कमावली म्हणजे ते चालवणे सोपे होते असे कोणी सांगितले? पण तरीही तामिरला बराच आधार मिळाला, पुढे कापडी साहेब थकले, चाऊस साहेब राहिले नाहीत. मग उर्दू वृत्तपत्रात दर्जा असूनही केवळ प्रेमावर आणि सहानुभूतीवर वृत्तपत्र चालवता येत नाही. हे आमच्या प्रमाणे काझीच्याही लक्षात आले. काझी ने झटपट निर्णय घेतला आणि वेगळे क्षेत्र निवडले. तसे मला करता आले नाही. काझीची मुलेही आमच्या प्रमाणे वडिलांना मदत म्हणून दैनिकात काम करत राहिली असती तर त्यानाही ते जमले नसते.ङ्काझीने दैनिक चालवले ते उत्तमच चालवले. तो एक मोठा जनसंपर्क, दृष्टी असलेला उत्तम पत्रकार आहे. बशीरगंज सोडल्यामुळे भेटी, बैठका कमी झाल्या पण ३५ वर्षांची आमची मैत्री, संपर्क आजही कायम, घट्ट आहे. आज त्यांचा जन्मदिन, ते किती वर्षाचे झाले माहीत नाही. पण त्यांचे अनेक वाढदिवस आपल्याला साजरे कारायचे आहेत. त्यामुळे त्यांच्या बद्दल पुन्हा आणखी लिहिता येणार आहे. आज त्यांना वाढदिवसानिमित्त माझ्या, कुटुंबाच्या आणि संकेत परिवाराच्या हार्दिक शुभेच्छा.

दिव्य वार्ता विशेष

पान १ वरून

## आठ दिवसात भुजवा

भुजवावे आणि या ठिकाणी दर्जेदार सिमेंट रस्ता करण्यात यावा तसेच मोमीनपुरा परिसरातील चिखलमय झालेल्या भागात तात्काळ मुरूम टाकण्यात यावे नसता या खड्ड्यात बेशरमाचे झाडे लावून आणि खड्ड्यात बसून आंदोलन करण्यात येईल असा इशारा पेठ बीड भागातील समाजसेवक हाजी महेबूब खान यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

याबाबत पत्रकात म्हंटले आहे की, मागील आठ दिवसाच्या जोरदार पावसामुळे पेठ बीड भागातील दिलावर नगर, अख्तर नगर, गांधी नगर, मोहंमदीया कॉलनी, सय्यद अली नगर, शहेंशाहवली दर्गा परिसर या भागात सर्वच ठिकाणी चिखलच चिखल झालेला आहे. या परिसरातील नागरीकांना ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना ये जा करण्यासाठी रस्ता नसल्याने शाळा बुडत आहे याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होत आहे तसेच चांदणी चौक जुना पुल ते राजुरीवेस पर्यंत रस्त्यावर मोठ मोठे खड्डे झाले आहेत या रस्त्यावरून ये जा करतांना वाहन धारकांना मोठा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आजारी असलेल्या लोकांना घेवुन जाणे म्हणजे त्यांचा जीव धोक्यात टाकण्यासारखाच आहे. या परिसरातील नागरीकांना जिल्हा रूग्णालयासह इतर रूग्णालयात जाण्यासाठी हा एकच रस्ता असून रात्री अपरात्री एखाद्या महिलेला प्रसुतीसाठी घेवून जायचे असेल तर या खड्ड्याच्या दणक्यामुळे रस्त्यातच प्रसृती होवू शकते. तरी नगर पालिका प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेत आठ दिवसात हे दोन्ही कामे न केल्यास बेशरमाचे झाडे लावून खड्ड्यात बसून आंदोलन करण्याचा इशारा हाजी महेबूब खान यांनी दिला आहे.

## नारायणड संस्थान येथे

स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था व इतर सोयीसुविधा देण्यात याव्यात. तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे निरीक्षण व देखरेख यासाठी संबंधित अधिकारी यांच्या वतीने अंमलबजावणी करण्यात यावी. वरील प्रमाणे सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून आवश्यक ती कारवाई करावी जेणेकरून दसरा मेळावा शांततेत, निस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडेल. सदर मेळाव्यास कोणताही अडथळा येऊ नये शिस्तबद्ध व सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे यासाठी आवश्यक सर्व शासकीय उपायोजना करण्यात याव्यात या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड, उपविभागीय अधिकारी बीड/पाटोदा, तहसीलदार बीड/ शिरूर कासार, जिल्हा आरोग्य अधिकारी बीड, जिल्हा शल्य चिकित्सक बीड,अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.ली.बीड,विभाग, नियंत्रक एस.टी महामंडळ बीड यांच्याकडे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्रकातून मागणी केली आहे.

## इंदूरच्या कापड

जिहादच्या तक्रारी आल्या आहेत. हे कारस्थान आता कोणतीही काल्पनिक गोष्ट राहिलेली नाही. आमच्या कापड बाजारात महिला मोठ्या संख्येनं येतात आणि मुस्लीम सेल्समन त्यांना लव जिहादमध्ये फसवतात.शीतलामाता कापड बाजाराचे अध्यक्ष हेमा पंजवानी बीबीसीला म्हणाले, आमच्या एकलव्य भैयांचा आदेश होता की बाजारपेठेतून मुस्लीम सेल्समन आणि व्यापाऱ्यांना बाहेर काढण्यात यावं. त्यांच्याकडे अनेकदा लोक लव जिहादचा मुद्दा घेऊन गेले होते.भाजपाच्या अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष एजाज अंसारी म्हणाले की ते सध्या 'दौऱ्यावर आहेत'. परतल्यानंतर या प्रकरणाची माहिती घेऊन मग ते योग्य ती पावलं उचलतील.इंदूर पोलीस दलाचे अतिरिक्त पोलीस उपायुक्त राजेश दंडोतिया यांनी बीबीसीला सांगितलं की आतापर्यंत त्यांच्याकडे अशी कोणतीही तक्रार आलेली नाही.तर आमदार मालिनी गौड, महापौर पुष्यमित्र भार्गव, इंदूर भाजपाचे अध्यक्ष समित शर्मा आणि वरिष्ठ नेते कैलाश विजयवर्गीय यांनी यावर भाष्य करण्यास नकार दिला.यादरम्यान जिहादी मानसिकतेपासून सुटका करण्यासाठी धन्यवादचे पोस्टर इंदूरच्या बाजारपेठेतील काही वेगळंच वास्तव सांगत आहेत.तोपर्यंत अनेक मुस्लीम सेल्समनना नोकरीवरून काढण्यात आलं होतं. तसंच अनेक मुस्लीम व्यापाऱ्यांनी त्यांची दुकानं रिकामी केली होती किंवा करणार होते.

मुस्लीम समुदायाच्या लोकांना बाजारपेठेतून बाहेर काढण्याच्या आदेशानंतर नोकरी गमवावी लागलेले सलमान (नाव बदललं आहे) बीबीसीला म्हणाले, आमचं कोणाशीही शत्रुत्व नाही. आमच्यासमोर अडचणी आहेत, मुलांच्या शाळेची फी भरायची आहे, घरासाठी किराणा विकत घ्यायचा आहे, कर्जाची परतफेड करायची आहे.ते म्हणतात, मी जवळपास १६ वर्षांपासून या बाजारात काम करतो आहे. मी इथेच लहानाचा मोठा झालो आहे आणि आता दोन मुलांचा बाप आहे. आता १५-२० दिवसांपासून बेरोजगार आहे. कुठे जाणार? काय करायचं तेच समजत नाही.भोपाळचे वरिष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक देशदीप सक्सेना म्हणतात, या संपूर्ण प्रकरणातून प्रश्न उभा राहतो की शेवटी सरकारला काय करायचं आहे? कारण या प्रकरणात घटनात्मक मूल्यांचा ऱ्हास आणि अधिकाराचं उल्लंघन झाल्याचं स्पष्ट दिसतं आहे.एका समुदायाच्या लोकांकडून त्यांच्या धर्माच्या आधारे, आयुष्य जगण्याचा अधिकार, नोकरी किंवा काम करण्याचा अधिकार हिरावून घेतला जातो आहे. समता, समानता आणि बंधुत्व यासारख्या मूल्यांचा झालेला ऱ्हास आणि प्रशासनापासून सरकार आणि वरिष्ठ नेत्यांचं मौन, अनेक प्रश्न उभे करतं.

आदिल आणि सुखविंदर भागीदारीत दुकान चालवतात. एकलव्य सिंह गौड यांच्या आदेशामुळे आदिल आणि सुखविंदर यांनादेखील त्यांचं दुकान रिकामं करावं लागलं.सुखविंदर बीबीसीला म्हणाले, मी हिंदू आहे आणि माझा भागीदार मुस्लीम आहे. आम्ही २० वर्षांपासून एकत्र काम करत आहोत. एकलव्य सिंह गौड यांनी लव जिहादचा आरोप केला. मात्र माझा प्रश्न आहे की आतापर्यंत असं एक तरी प्रकरण समोर आलं आहे का?आदिल म्हणतात, आमच्यामुळे आमच्या भागीदाराचं उपजीविकेचं साधनदेखील हिरावून घेण्यात आलं. आता आम्ही काय करायचं?सुखविंदर यांनी आदिल यांच्या खांद्यावर हात ठेवला आणि आम्हाला म्हणाले, या देशात कायदा आहे, सरकार-प्रशासन आहे. एकलव्य सिंह गौड त्याच्या पुढे जाऊन स्वत:चा कायदा तर चालवू शकत नाही ना?इंदूरच्या कापड व्यापारी संघाचे अध्यक्ष हेमा पंजवानी म्हणतात, हिंदू रक्षा संघटनेचे आमचे भैय्या एकलव्य सिंह गौड यांचा आदेश होता. आम्ही त्याचं पालन करत आहोत.त्यांनी प्रत्येक दुकानदाराला बोलावून समजावलं की बाजारात जे सुरू आहे (लव जिहाद), ते लगेच थांबवण्यात यावं. बरेचसे मुस्लीम लोक आता इथून गेले आहेत.त्यांना जेव्हा विचारण्यात आलं की एखाद्या मुस्लीम कर्मचारी किंवा दुकानदाराविरोधात एखादी अधिकृत तक्रार नोंदवण्यात आली आहे का, त्यावर त्यांचं उत्तर होतं, माझ्याकडे याची कोणतीही माहिती नाही.नोकरीवरून काढण्यात आलेल्या एका मुस्लीम सेल्समननं नाव छापण्याच्या अटीवर सांगितलं, स्वत:ला हिंदुत्ववादी नेता म्हणून सिद्ध करता यावं यासाठी एकलव्य सिंह गौड हिंदू व्यापाऱ्यांवर दबाव टाकत आहेत. मग त्यासाठी मुस्लिमांचं आणि त्यांच्या कुटुंबांचं आयुष्य उद्ध्वस्त का होईना.इंदूर पोलीस दलाचे अतिरिक्त पोलीस उपायुक्त राजेश दंडोतिया म्हणतात, आतापर्यंत असं कोणतंही प्रकरण आमच्याकडे आलेलं नाही. जर तक्रार करण्यात आली, तर आम्ही योग्य ती कायदेशीर कारवाई करू.अर्थात १५ सप्टेंबरला मुस्लीम सेल्समन आणि व्यापाऱ्यांनी इंदूरच्या विभागीय आयुक्तांकडे तक्रारीचं निवेदन दिलं होतं. मात्र असं असूनही पोलिसांचं असं म्हणणं की त्यांच्याकडे कोणतीही तक्रार नोंदवण्यात आलेली नाही, यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होतात.काँग्रेसचे नेते दिग्विजय सिंह म्हणाले की राज्यात जातीयवाद वाढतो आहे आणि मुस्लिमांना काम करण्यापासून रोखणं हा कायदेशीर गुन्हा आहे. यावर कारवाई करण्यात आली पाहिजे.तर भाजपाचे प्रदेश मीडिया प्रभारी आशीष अग्रवाल यांनी यावर टिप्पणी करण्याचं टाळलं, ते म्हणाले, पक्ष सर्वांची साथ, सर्वांचा विकास या लक्ष्यावर काम करतो आहे.

## सारथी'वसतिगृहे

गंभीर समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे काल एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे.डॉ. ज्योतीताई मेटे यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, खासगी संस्थांमार्फत वसतिगृहे सुरू करणे शक्य होत नसल्यास, सरकारने 'छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतिगृहे योजना' अधिक प्रभावीपणे राबवून तातडीने ही वसतिगृहे सुरू करावीत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी हा निर्णय त्वरित घेणे आवश्यक आहे.डॉ.ज्योतीताई मेटे यांनी केलेल्या या महत्त्वपूर्ण पाठपुराव्यामुळे, मराठा समाजाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा विषय चर्चेला येणार आहे.आज,बुधवार, दि. ०१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे होणाऱ्या या महत्त्वाच्या बैठकीत डॉ. ज्योतीताई मेटे यांना विशेष आमंत्रित करण्यात आलेले असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा प्रश्न मार्गी लागणे अत्यंत आवश्यक आहे आणि वसतिगृहांशी संबंधित हा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल,अशी प्रबळ आशा आहे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे.

## भ्रष्टाचाराची पोलखोल

सिंह यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करत चौकशीचे आदेश दिले आहेत. राजीव प्रताप सिंह बेपत्ता झाल्यापासून त्यांचे कुटुंबिय चिंतेत होते. सोमवारी त्यांचा मृतदेह सापडला.अतिशय धडाडीनं पत्रकारिता करणाऱ्या, लोकांचे प्रश्न लावू धरणाऱ्या राजीव प्रताप सिंह यांच्या मृत्यूनंतर सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या राजीव यांना सातत्यानं धमक्या दिल्या जात होत्या. मात्र त्यांना भीक न घातला राजीव यांनी निर्भीड पत्रकारिता सुरुच ठेवली. 'दिल्ली-उत्तराखंड लाईव्ह' नावानं ते डिजिटल प्लॅटफॉर्म चालवत होते. या माध्यमातून ते उत्तरकाशीतील स्थानिक मुद्दे, समस्या यांना राजीव प्रताप सिंह यांच्या वार्तांकनात महत्त्वाचं स्थान होतं. त्यामुळे स्थानिक पातळीवर राजीव यांची वेगळी ओळख निर्माण झाली.

राजीव यांनी काही दिवसांपूर्वीच उत्तरकाशी जिल्हा रुग्णालयाच्या दुरावस्थेची सविस्तर माहिती देणारा एक व्हिडीओ तयार केला होता, अशी माहिती त्यांच्या पत्नीनं दिली. 'जिल्हा रुग्णालयातील परिस्थिती गंभीर होती. रुग्णालयाच्या भिंतींना तडे गेले होते. औषधांचा तुटवडा होता. रुग्णांची स्थिती वाईट होती. या सगळ्या गोष्टी राजीव यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनलमधून समोर आणल्या. संबंधित अधिकाऱ्यांचं लक्ष त्यांनी याकडे वेधलं,' असं राजीव यांच्या पत्नीनं सांगितलं.राजीव प्रताप यांनी केलेला व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला. अनेकांनी व्हिडीओ पाहिला, तो शेअर केला. त्यामुळे रुग्णालयाच्या स्थितीवर बरीच चर्चा सुरु झाली. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राजीव प्रताप यांना जीवे मारण्याच्या धमक्या मिळू लागल्याचा दावा त्यांच्या कुटुंबियांनी केला आहे. धमक्या येत असल्यानं राजीव बरेच त्रासले होते. त्यांना मनस्ताप सहन करावा लागत होता. याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर झाला.राजीव प्रताप सिंह १८ सप्टेंबरच्या रात्री ११ वाजता गंगोत्री परिसरातून रहस्यमयरित्या बेपत्ता झाले. मित्राची कार घेऊन ते गंगोत्रीला गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांची कार भागिरथी नदीत स्यूंणा गावाजवळ सापडली. त्या कारमध्ये कोणीही नव्हतं. अखेर १० दिवसांनी राजीव प्रताप यांचा मृतदेह हाती लागला. राजीव यांच्या अकाली निधनानं त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

## बीडच्या कंकालेश्वर

आणि हेरिटेज पद्धतीने व्हावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. कामांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये तसेच या स्मारकांच्या परिसरातील एकही झाड तोडले जाणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार अध्यक्षस्थानी होते. बैठकीत कंकालेश्वर मंदिर, बीड व श्री भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, औंध (जि. सातारा) या राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन-दुरुस्तीच्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. या बैठकीस सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुरातत्त्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, दूरदृष्य प्रणालीद्वारे बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बाराव्या शतकातील यादवकालीन कंकालेश्वर मंदिराच्या जतन-दुरुस्तीकरिता शासनाने ९ कोटी १४ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. जलकुंडातील स्थापत्यदृष्ट्या आकर्षक असणाऱ्या या मंदिराच्या संवर्धनाबरोबरच परिसराचे सुशोभीकरण, सरोवरातील गाळ काढणे, पदपथ-दुरुस्ती, मंदिर जोत्यांचे मजबुतीकरण, गळती प्रतिबंधक योजना, बाग-बगीचा विकास अशी कामे करण्यात येणार आहेत. या मंदिराच्या संवर्धनासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

सातारा जिल्ह्यातील औंध येथील श्री भवानी संग्रहालय आणि ग्रंथालय हे महाराष्ट्रातील ऐतिहासिक महत्त्वाचे केंद्र आहे. औंध संस्थानचे अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी याची स्थापना केली. जगप्रसिद्ध चित्रकारांची चित्रे, शिल्पकला, दुर्मीळ ग्रंथ आणि पुरातन वस्तू यांचा अमूल्य ठेवा या संग्रहालयात जतन केला आहे. संशोधक, अभ्यासक आणि पर्यटकांसाठी हे ठिकाण विशेष आकर्षणाचे केंद्र आहे. औंध संग्रहालयाच्या सर्वंकष विकास आराखड्यासाठी ५२ कोटी ६ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, त्याअंतर्गत इमारतीचे संवर्धन, नवीन बांधकाम, अंतर्गत दालनांची उभारणी तसेच चित्रे-शिल्पे-ग्रंथांचे जतन अशा कामांचा समावेश आहे. कंकालेश्वर मंदिर आणि औंध संग्रहालय हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभव आहे. या दोन्ही ऐतिहासिक वारशांच्या संवर्धनासाठी निधी कमी पडू देणार नाही, मात्र या वारशाचे संवर्धन करताना दर्जा, सौंदर्य आणि पर्यावरणाचा समतोल राखूनच कामे करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

## जवळा येथे बैलगाडी

घडली.दिंद्रुड पंचक्रोशीतील फकीर जवळा येथील शेतकरी त्रिंबक बालासाहेब साबळे यांचा गडी भास्कर शिंदे हा गावालगत असलेल्या त्यांच्या गट क्रमांक १० मधील शेतात ओढ्याच्या कडेने बैलगाडी घेऊन विहिरी जवळून जात असताना अचानक बैलांनी ओढल्याने बैलगाडी विहिरीत गेली. यात एक बैल गाडीला अडकल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला मात्र सुदैवाने एका बैलाचा व गड्याचा जीव वाचला. घटनेची माहिती कळताच गावातील जमाव मोठ्या संख्येने जमला अन् जेसीबीच्या साह्याने बैल व बैलगाडी बाहेर काढण्यात आली. अगोदरच अतिवृष्टीमुळे पिके गेली आणि आता या घटनेने जवळा परिसरात शेतकऱ्यावर आलेल्या अस्मानी संकटामुळे हळहळ व्यक्त होत आहे. तलाठी पुजा आठवले, कृषी सहायक पी गवारे यांनी सरपंच, ग्रामस्थांसमक्ष पंचनामा केला असून, प्रशासनाने शेतकऱ्याला आर्थिक मदत करण्याची मागणी होत आहे.

## 'रोडकरी' नितीन

कोट्यावधीचा नफा कमवत जनतेची दिशाभूल करण्याचा ठपका सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गडकरी यांच्यावर लगावला. तर आता छत्रपती संभाजीनगर-पुणे रस्त्यावरील खड्ड्यांवरून एमआयएमने त्यांच्यावर टीका केली आहे.

इम्तियाज जलील यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनाही पुणे-छत्रपती संभाजीनगर या खड्डेच खड्डे असलेल्या रस्त्यावरून एकदा प्रवास करून दाखवाच, असे खुले आव्हान दिले आहे. त्यांनी या मार्गावरून प्रवास केला तर त्यांना दहा हजार एक रुपयांचे बक्षिस दिले जाईल, असे म्हणत राज्य आणि केंद्रातील मंत्र्यांची खिल्ली उडवली आहे.

इम्तियाज जलील काल पुण्यात होते. तिथे पत्रकार परिषदेत त्यांनी नगरमध्ये झालेल्या राड्यासह राज्यातील विविध प्रश्नावर आपली भूमिका मांडली. पुण्याहून छत्रपती संभाजीनगरकडे येत असताना त्यांना नेहमीपेक्षा अधिकचे खड्डे या मार्गावर पडल्याचे जाणवले. तसा पुणे-संभाजीनगर प्रवास ते नेहमीच करतात, पण गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात प्रचंड पाऊस, अतिवृष्टी पुर परिस्थिती निर्माण झाली. याचा परिणाम रस्त्यावर खड्डे पडण्यातही झाला. नेमकं याच मुद्यावरून इम्तियाज जलील यांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

इम्तियाज जलील यांनी एक्सवर पोस्ट करत नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार या नेत्यांना टोला लगावला. पुणे-छत्रपती संभाजीनगर-पुणे रस्त्याला देशातील सर्वात वाईट रस्ता म्हणून मान्यता मिळाली पाहिजे. रस्त्यावर खड्डे नाहीत तर खड्डेच खड्डे आहेत. या रस्त्यावरून एकदा प्रवास केल्यास नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांना १०००१ रुपयांचे बक्षीस देईन, असा टोला लगावला.खासदार असताना इम्तियाज जलील कायम दिल्लीत नितीन गडकरी यांची भेट घ्यायचे. अनेकदा त्यांच्या कामाचे, त्यानी देशभरात उभारलेल्या रस्ते आणि उड्डाणपुलांचे तोंडभरून कौतुकही ते करायचे. भाजपमधील एकमेव गडकरी असे नेते आहेत, ज्यांच्याबद्दल वाईट बोलता येणार नाही, असेही इम्तियाज जलील म्हणायचे. शेंद्रा एमआयडीसी ते वाळूज असा एकच अखंड उड्डाणपूल शहरात असावा, यासाठी इम्तियाज यांनी गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. परंतु हा प्रस्ताव पुढे सरकलाच नाही.

इम्तियाज जलील हे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा आणि त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले. आता महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष म्हणून ते राज्यभरात दौरे करत आहेत. नगरमधली वादानंतर त्यांनी काल असदुद्दीन ओवोसी यांच्यासोबत सभा घेण्याचाही प्रयत्न केला, पण त्याला पोलीसांनी परवानगी नाकारली. दरम्यान, पुण्याहून परत असताना त्यांना रस्त्यावरील खड्डे जाणवले आणि त्यांनी नितीन गडकरीसह राज्यातील नेत्यांनाही डिवचले.

## अनिल देशमुखांवरील

आणि फॉरेन्सिक तपासात संबंधित घटना खोटी असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. नागपूर ग्रामीण पोलिसांनी न्यायालयात 'बी फायनल' रिपोर्ट पाठवल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी पुरावेच शोधले नाहीत तर फॉरेन्सिक तपास देखील केला होता. पण पोलिसांना या प्रकरणात कोणतेही तथ्य आढळले नाहीत. त्यामुळे या घटनेबाबत कोणताही तपास होऊ शकत नाही. ही घटना फर्जी होती असा आशयाचा रिपोर्ट पोलिसांकडून न्यायालयात देण्यात आला आहे. 'एबीपी माझा'ने याबाबतचं वृत्त दिलं आहे.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १९ नोव्हेंबर २०२४ ला हल्ला झाला होता. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी त्यावेळी सुरु होती. प्रचार अंतिम टप्प्यावर असताना अनिल देशमुख यांच्यावर हल्ल्याची घटना घडली होती. अनिल देशमुख मुलाच्या प्रचारासाठी गेले होते. या दरम्यान नरखेडवरुन काटोलच्या दिशेला परतताना बैलफाटा येथे अंधारात लपलेल्या चार लोकांनी अचानक गाडीसमोर येऊन दगडफेक केली, असा आरोप करण्यात आला होता. या दगडफेकीत अनिल देशमुख गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या डोक्याला इजा झाली होती. या घटनेनंतर त्यांच्यावर नागपूरच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. त्यावेळी प्रचंड राजकीय वातावरण तापलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यावेळी रात्री उशिरापर्यंत आंदोलन केलं होतं.

मोठं राजकीय वादळ या घटनेनंतर निर्माण झालं होतं. पण पोलीस आणि फॉरेन्सिक तपासात या घटनेत कोणतही तथ्य आढळलेलं नाही. त्यामुळे ही घटना खरंच घडली होती की राजकीय सहानुभूती निर्माण करण्यासाठी ती घटना घडवण्यात आली होती? असा प्रश्न पोलिसांच्या बी फायनल रिपोर्टनंतर उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या घटनेवर आता अनिल देशमुख काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

लेखकाबद्दलचेतन पाटीलचेतन पाटील हे पत्रकार आहेत. त्यांना राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, मनोरंजन आणि क्रीडा अशा विविध बीटच्या बातम्या केल्याचा अनुभव आहे. चेतन पाटील यांनी दैनिक लोकमत, न्यूज २४, जय महाराष्ट्र, आपलं महानगर, न्यूज १८ लोकमत, टीव्ही ९ मराठी अशा विविध वृत्त संस्थांमध्ये काम केल्याचा अनुभव आहे. चेतन हे जवळपास ८ वर्षांपेक्षा अधिकचा काळ माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी कल्याणच्या नामांकित बिर्ला महाविद्यालयातून पत्रकारितेतील पदवी शिक्षण घेतलं आहे. त्यांना पदवीचं शिक्षण घेत असताना एका पॉलिटीकल पीआर कंपनीसोबत काम करण्याचा अनुभव आहे. सध्या ते महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन येथे कार्यरत आहेत. चेतन पाटील यांनी केलेल्या बातमीमुळे एका निराधार वृद्ध महिलेला खूप मोठी मदत झाली. याशिवाय चेतन पाटील यांनी लिहिलेल्या अनेक बातम्यांचा पॉझिटिव्ह इम्पॅक्ट पडलेला बघायला मिळाला आहे. चेतन पाटील महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांच्या 'भगतसिंग' कवितेची निवड अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कवीकट्टा सदरात वाचनासाठी झाली होती. चेतन पाटील यांनी नाटकातही काम केलं आहे. त्यांनी राज्य नाट्य हौशी स्पर्धेत भाग घेतलाय. त्यांनी 'जलरंग तापी' नाट्य संस्थेसोबत काम करत असताना 'नटसम्राट' नाटकात बूटपॉलिश करणाऱ्या राजाची भूमिका साकारली होती. त्यांची ही भूमिका प्रचंड भाव खाऊन गेली होती. त्यांच्या अभिनयाने प्रभावित होऊन एका प्रेक्षकाने त्यांना खांद्यावर उचलून घेत नृत्य केलं होतं. खूप छोट्या गोष्टींमधून आनंद शोधावा, असं त्यांचं मत आहे. त्यांना पत्रकारितेसह वाचन, लेखनाची आवड आहे. चेतन पाटील यांचं आतापर्यंतचं वैयक्तिक आयुष्य खूप संघर्षमय आणि खडतर असल्यामुळे ते फार संवेदनशील आहेत. त्यामुळे संवेदनशील बातम्या हाताळताना ते अशा बातम्यांना न्याय देण्याचा पूरेपूर प्रयत्न करतात.